N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

पोलीस निरीक्षक, पाचोरा पो.स्टे. जि.जळगाव

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** पाचोरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0393 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**20/08/2026 18:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिंनाक पासून):** 07/07/2026

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 07/07/2026

**Time From (वेळेपासून):** 15:52 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:52 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 20/08/2026 **Time (वेळ):** 17:58 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 023

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 20/08/2026 17:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, .100 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पाचोरा तहसिल कार्यालय आवारात,पाचोरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पद्मावती मधुसुदन कलाल

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ए सी बी पथक धुळे ,धुळे,पाचोरा,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ए सी बी पथक धुळे ,धुळे,पाचोरा,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788986178

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | समाधान सुभाष पाटील | | | 1. कु-हाड बु,पाचोरा,पाचोरा, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

पोलीस निरीक्षक, पाचोरा पो.स्टे. जि.जळगाव

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी पद्मावती मधुसूदन कलाल, वय 43 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन सरकारतर्फे फियाद देते की, आम्ही लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे एक वर्षापासुन कार्यरत आहे. दि.07.07.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उप अधीक्षक श्री. सचिन साळुंखे यांनी आम्हास सांगितले की, त्यांना तक्रारदार श्री. रामेश्वर सुभाष बंजारा यांनी फोन करुन त्यांच्याकडे पाचोरा येथील एक लाकसेवक लाचेची मागणी करीत असल्याचे माहिती दिल्याने पोलीस उप अधीक्षक श्री. साळुंखे यांनी आम्हास पाचोरा येथे जावून तक्रारदार यांची भेट घेवून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होत.त्याप्रमाणे आम्ही कार्यवाही करण्याकरिता मा. आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे यांना पत्र देवून त्यांचेकडील श्री. भुषण कैलास बाविस्कर, लिपिक व श्री. मोहन सटवाजी गवळी, स्वीय सहायक यांना पंच म्हणून उपलब्ध करुन घेतले.यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनाने धुळे ला.प्र.वि. कार्यालयातून पाचोरा येथे जावून भडगाव - पाचोरा रस्त्यावरील मधुकुसुम मॅरेज लॉन्सच्या समोरील रस्त्यालगत तक्रारदार श्री. रामेश्वर सुभाष बंजारा यांची भेट घेतली तेव्हा आम्ही त्यांना आमची, पंचांची व सापळा पथकाची ओळख देवून त्यांची ओळख करुन घेतली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारीची तोंडी हकीकत सांगून त्यांची लेखी तक्रार त्यांनी त्यांच्या स्वहस्ताक्षरात लिहून दिली ती पुढीलप्रमाणे, ''माझे आजोबा ममराज हजारी वंजारी यांच्या नावे मौजे कु-हाड खु. ता. पाचोरा जि.जळगाव येथे गट नं 117/4, क्षेत्र 1 हेक्टर 60 आर असुन सदर शेत जमिनीच्या 7/12 उता-यावर इतर अधिकारात झिपरू चुनीलाल वगैरे व दत्तात्रय जोतीराम आव्हाड तसेच ए.कु.क. शरद राजमल संघवी या नावांच्या कालबाहय नोंदी पुर्वापार झालेल्या आहेत. त्या कालबाहय नोंदीमुळे बॅक व सोसायटी कडुन कर्ज घेतांना वेळोवेळी अडचमी पद्मावती ण येते. त्यामुळे मी 7/12 उता-यासह सुमारे 4 ते 5 दिवसापुर्वी तहसिल कार्यालय पाचोरा येथे तलाठी नकुल काळकर यांची भेट घेवुन त्यांना माझ्या आजोबांच्या नावे असलेल्या शेत जमिनीच्या 7/12 उता-यावरील इतर अधिकारातील कालबाहय नोंदी कमी करण्याबाबत विंनती केली. तेव्हा तलाठी नकुल काळकर यांनी, ''कालबाहय नोंदी कमी करण्यासाठी तुला 80,000/- रू दयावे लागतील, त्याशिवाय मी त्या नोंदी कमी करणार नाही.'' असे सांगुन ''याकामासाठी यापुढे स्टॅम्प वेंडर समाधान पाटील याला भेट, मी पुन्हा या विषयावर तुझ्याशी बोलणार नाही जे काही बोलायचे ते त्याच्याशी बोलुन त्यांच्याकडे पैशे दे, पैशे दिल्यावर तुझे काम होईल'' असे सांगितले आहे. माझी तलाठी नकुल काळकर यांना त्यांच्या मागणीप्रमाणे 80,000/-रूपये देण्याइतकी आर्थिक परिस्थीती नाही. परंतु त्यांना पैसे दिले नाही तर ते माझे कालबाहय नोंदी कमी करण्याचे काम करणार नाहीत. त्यांचेशी माझा कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वाद विवाद नाही.मी आज दि. 07.07.2026 रोजी तलाठी नकुल काळकर व स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांची भेट घेण्यास पाचोरा तहसिल कार्यालयात जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपल्या विभागामाफत कायदेशीर कारवाई करावी हि विंनती आहे.'' त्यांनतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना देवून पंचांपैकी श्री.भुषण बाविस्कर यांना तक्रारदार यांचेसोबत त्यांचे नातेवाईक भासवून तलाठी नकुल काळकर व स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांची भेट घेण्यास पाठविण्याचा निंणय घेतला. त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवून तक्रारदार व पंच नं.1 बाविस्कर यांना तक्रारदार यांच्या दुचाकीने तलाठी काळकर व स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय पाचोरा येथे रवाना केले. त्यावेळी आम्ही तेथेच शासकीय वाहनात थांबून होतो.काही वेळाने तक्रारदार व पंच नं 01 हे दुचाकीने आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. तेव्हा पो. कॉ. प्रशांत बागुल यांनी तक्रारदार यांच्याकडील डिजिटील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केले. त्यानंतर डिजिटील व्हॉईस रेकॉर्डर मधील तक्रारदार, तलाठी काळकर व स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांचेतील ध्वनीमुद्रित झालेले संभाषण एकुण तलाठी काळकर यांनी तक्रारदार यांचेशी त्यांचेकामाबाबत चर्चा करुन तक्रारदार यांचे कालबाहय नोंदी कमी करण्यासाठी

तहसिलदाराचा आदेश घ्यावा लागेल सदरचा अधिकार त्यांचा नसून तहसिलदार साहेबांचा आहे असे सांगितले. तसेच स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांनी तक्रारदार यांचेशी त्यांच्या कालबाहय नोंदीच्या कामाबाबत चर्चा करुन ते काम करुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती 85,000/- (पंच्याहंशी हजार रुपये)मागणी करुन स्वीकारण्याचे मान्य केल्याबाबत आमची, पंचांची व सापळा पथकाची खात्री झाली. त्यानंतर आम्ही पंच न. 01 यांना हकीकत विचारली असता त्यांनी, '' तलाठी काळकर यांनी तक्रारदार यांचेशी चर्चा करुन तक्रारदार यांचे कालबाहय नोंदी कमी करण्यासाठी तहसिलदाराचा आदेश घ्यावा लागेल सदरचा अधिकार त्यांचा नसून तहसिलदार साहेबांचा आहे असे सांगितले.त्यानंतर तक्रारदार व मी यांनी तहसिल कार्यालयाच्या आवारातील शेडमध्ये गेलो, तेथे तक्रारदार यांनी स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांची भेट घेतली तेव्हा त्यांच्यात तक्रारदार यांच्या कालबाहय नोंदीच्या कामाबाबत चर्चा झाली तेव्हा स्टॅम्पवेंडर समाधान पाटील यांनी हाताचे एक बोट दाखवून एक लाखाचा इशारा करुन एका कागदावर एक लाख असे लिहून दाखविले तेव्हा तक्रारदार यांनी एक लाख थोडेफार कमी करा असे सांगितले. तेव्हा त्यांनी काय कमी करु असे सांगितले. त्यानंतर स्टॅम्पवेंडर समाधान पाटील यांनी कागदावर ''90'' असे लिहून तक्रारदारांना दाखविले.तेव्हा तक्रारदार यांनी 90,000/- रुपयेपण जास्त होतात असे सांगितले.तेव्हा त्यांचेत चर्चा होवून स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांनी 85,000/- दया असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी 10,000/- रुपये कमी करा असे सांगितले असता स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांनी ''जाउ दे विषय बंद करुन टाक'' असे सांगितले. तेव्हा पाटील यांनी पैसे सुरेश जवळ जमा करावे लागेल काम झाल्यावर तो मला पैसे देईल असे सांगितले.'' अशी हकीकत कथन केली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्याकडे सापळा कार्यवाही कामी स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांनी मागणी केलेले 85,000/-रुपये नसून त्यांच्याकडे 2/3 दिवसात पैसे येणार असून पैसे आल्यावर मी तुम्हाला कळवितो., त्यावेळी सपाळा कार्यवाहीचे आयोजन करा असे आम्हाला पंचासमक्ष सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना, ''स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांनी आपल्याकडे 7/12 उता-यावरील कालबाहय नोंद कमी करण्याचे काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केली असुन आपणास तलाठी काळकर यांना पुन:श्च भेटुन सापळा कारवाई आगोदर पडताळणी करावयाची आहे'' असे सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांच्याशी आज भेट झाल्यास अथवा त्यांचा फोन आल्यास उदया पैसे देतो असे सांगुन वेळ काढुन न्यावा व आपल्याकडे सापळा कारवाई कामी पैसे उपलब्ध झाल्यावर आम्हास कळवावे तसेच आज झालेल्या संपुर्ण कार्यवाहीबाबत गोपनियता राखण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही पुढील कार्यवाही ला.प्र.वि. धुळे कार्यालयात जावून करण्याचा निणय घेतला. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे ला.प्र.वि. धुळे कार्यालयात परत येवून दिंनाक 07/07/2026 रोजी झालेल्या संपूर्ण कार्यवाहीचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे. त्यांनतर तक्रारदार श्री. रामेश्वर बंजारा यांनी दिंनाक 09/07/2026 रोजी आम्हास दुरध्वनीद्वारे त्यांच्याकडे सापळा कारवाई कामी पैसे उपलब्ध झाल्याचे सांगितल्याने आम्ही पाचोरा येथे जावून तक्रारदार यांची भेट घेवून पुढील कार्यवाही करण्याचे ठरविले.त्यानंतर आम्ही पंच भुषण कैलास बाविस्कर, लिपिक व श्री. मोहन सटवाजी गवळी, स्वीय सहाय्यक यांना सुचित करुन त्यांना ला.प्र.वि.कार्यालयात बोलावून घेतले.त्यांनतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनाने रवाना होवून पाचोरा येथे भडगाव रोडवरील मधुकुसुम मॅरेज लॉन्सजवळ तक्रारदार यांची भेट घेतली. तेव्हा तक्रारदार यांनी सापळा कारवाई कामी देण्याकरिता पैसे उपलब्ध झाले असल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना सापळा कार्यवाही आयोजित करण्यापुर्वी आपणास तलाठी यांना भेटुन पडताळणी कार्यवाही करायचे आहे असे सांगितले. त्यानंतर आम्ही व सापळा पथक शासकीय वाहनाने व तक्रारदार रामेश्वर बंजारा हे त्यांच्या दुचाकीने सदर ठिकाणाहुन रवाना होवुन पाचोरा रेल्वे स्टेशन समोरील रस्त्यालगत डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया जवळ येवुन थांबलो.तेथे आम्ही तक्रारदार व पंचांना पडताळणी कार्यवाही बाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यांनतर तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवून तक्रारदार व पंच नं.1 बाविस्कर यांना तक्रारदार यांच्या दुचाकीने तलाठी काळकर यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय पाचोरा येथे रवाना केले. त्यावेळी आम्ही तेथेच शासकीय वाहनात थांबून होतो. काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे दुचाकीने आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. तेव्हा पो. कॉ.बागुल यांनी तक्रारदार यांचेकडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केले. तेव्हा आम्ही पंच नं. 01 यांना रवाना केल्यापासूनचे ते परत येईपावेतोची हकीकत विचारली असता त्यांनी, ''मी तक्रारदार असे पायी चालत जावुन जवळच असलेल्या तहसिल कार्यालयात गेलो. तेथे तक्रारदार यांनी तहसिल कार्यालयात तलाठी काळकर यांचा शोध घेतला परंतु ते कार्यालयात मिळुन न आल्याने मी व तक्रारदार आपणाकडे परत आलो आहे.'' अशी हकिगत कथन केली. त्यानतर तक्रारदार यांनी देखील पंच नं 1 यांनी सांगितल्या प्रमाणेच हकिगत सांगितली. तक्रारदार यांची तलाठी काळकर यांच्याशी भेट न झाल्याने तक्रारदार यांच्याकडे दिलेल्या व्हॉईस रेकॉर्डरमध्ये कोणतेही संभाषण ध्वनिमुद्रीत झालेले नसल्याने स्क्रिप्ट काढण्यात आलेली नाही. त्यांनतर आम्ही पंचासमक्ष तक्रारदार यांच्याशी चर्चा करून त्यांना त्यांच्या मोबाईलवरून स्पिकर सुरू करून तलाठी काळकर यांच्या

मोबाईलवर कॉल लावण्यास सांगुन पोकॉ/बागुल यांना तक्रारदार यांचे तलाठी काळकर यांच्याशी मोबाईलवर होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलवरून स्पिकर सुरू करून तलाठी काळकर यांच्या मोबाईल क्र. 9860255453 वर फोन लावला. परंतु तलाठी काळकर यांनी तक्रारदार यांचा फोन उचलला नाही. त्यांनतर काही वेळाने 14:55 वा तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलच्या व्हाटसऍपवर तलाठी काळकर यांचा फोन येत असल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना तलाठी काळकर यांचा व्हाटसऍप कॉल मोबाईलचा स्पिकर सुरू करून उचलण्यास सांगुन पोकॉ/बागुल यांना त्यांचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी तलाठी काळकर यांचा व्हाटसऍप कॉल उचलला. तेव्हा तक्रारदार व तलाठी काळकर यांच्यात तक्रारदार यांच्या कालबाहय नोंदी कमी करण्याबाबत चर्चा झाली. चर्चे दरम्यान तक्रारदार यांनी स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांनी त्यांच्याकडे कालबाहय नोंद कमी करण्याच्या कामासाठी 60,000/-रू मागणी केल्याचे सांगितले. तेव्हा तलाठी काळकर यांनी तक्रारदार यांना ''तो काही माझा कर्मचारी नाही मी त्याला बोलु शकत नाही'' तसेच ''माझ्या हातात काही नाही. मी काही तहसिलदार आहे का?'' असे सांगितले. परंतु त्यांनी तक्रारदार यांना स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांना लाचेची रक्कम देवु नका त्यांचा कालबाहय नोंदी कमी करण्याच्या कामाशी काहीएक संबंध नाही असे तक्रारदार यांना सांगितलेले नाही. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना तलाठी काळकर व स्टॅम्प वेंडर समाधान पाटील यांच्याशी भेट झाल्यास अथवा त्यांचा फोन आल्यास उदया पैसे देतो असे सांगुन वेळ काढुन न्यावा असे सांगुन सदर दिवशी झालेल्या संपुर्ण कार्यवाहीबाबत गोपनियता राखण्याच्या सुचना देवून ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येवून दि. 09/07/2026 रोजी झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.
अशा प्रकारे स्टॅम्पवेंडर समाधान पाटील यांनी तक्रारदार श्री. रामेश्वर सुभाष बंजारा यांना तहसिल कार्यालय, पाचोरा येथील अधिकारी/कर्मचारी यांचा तक्रारदार यांचेवर प्रभाव पाडून तक्रारदार यांच्याकडे त्यांचे शेतजमीनीच्या 7/12 उता-यावरील इतर अधिकारात असलेल्या कालबाहय नोंदी कमी करुन देण्याचे काम करुन देण्यासाठी 1,00,000 /- रुपये लाचेची मागणी करुन त्यांनी तडजोडीअंती 85,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले असल्याने त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7-अ प्रमाणे माझी कायदेशिर फियाद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Rahul Dattatray Pawar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

पोलीस निरीक्षक, पाचोरा पो.स्टे. जि.जळगांव

पोलीस निरीक्षक, पाचोरा पो.स्टे. ★ जि.जळगाव ★

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rahul Dattatray Paw
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अंमलदार
पाचोरा पोलीस स्टेशन,
जि जळगांव

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

पोलीस निरीक्षक, पाचोरा पो.स्टे. जि.जळगांव